मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# आयुक्तांचा महापालिकेच्या कामकाजाचा आढावा

## कार्यालयीन शिस्त, विभागातील स्वच्छता आणि पारदर्शक कामकाजावर भर देण्याच्या दिल्या सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील विविध विभागांना भेट देत कामकाजाची सखोल पाहणी केली. या पाहणीदरम्यान प्रशासन अधिक कार्यक्षम, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना विविध सूचना दिल्या

या पाहणी दरम्यान त्यांचे समवेत उप संचालक किशोर गोखले, सह आयुक्त मनोज लोणकर, मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह शहर अभियंता सुनील भागवानी, बापू गायकवाड, अनिल भालसाखळे, उप आयुक्त राजेश आगळे, सचिन पवार, चेतना केरुरे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पाहणीदरम्यान आयुक्त डॉ. सूर्यवंशी यांनी प्रत्येक विभागातील दैनंदिन कामकाज, प्रलंबित विषय, नागरिकांकडून येणाऱ्या तक्रारी व त्यावर करण्यात येणारी कार्यवाही याबाबत सविस्तर माहिती घेतली. तसेच अधिकारी व कर्मचाऱ्यांशी थेट संवाद साधत कामातील अडचणी, आवश्यक मनुष्यबळ, तांत्रिक सुविधा यांचा आढावा घेतला. प्रशासनातील कामकाज अधिक सुटसुटीत आणि गतिमान करण्यासाठी विभागीय पातळीवर समन्वय वाढविण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी त्यांनी विभागांची अंतर्गत रचना, बैठक व्यवस्था आणि कार्यालयीन परिसराची स्वच्छता यावर विशेष भर दिला. कार्यालयीन जागा अधिक सुव्यवस्थित, स्वच्छ आणि कामकाजास पूरक राहील, यासाठी जुन्या फाईल्स व अनावश्यक कागदपत्रांचे गट्ठे तत्काळ हटविण्याच्या सूचना त्यांनी केल्या. डिजिटल पद्धतींचा अधिकाधिक वापर करून कागदवि रहित कामकाज वाढविण्यावर भर दिला.

कर्मचाऱ्यांसाठी सकारात्मक आणि प्रेरणादायी कार्यपरिसर निर्माण करणे तसेच नागरिकांना कार्यालयात येताना सुलभ आणि विश्वासार्ह सेवा अनुभव मिळणे अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले. याशिवाय कार्यालयीन वातावरण सुधारल्यास कामकाजाची गुणवत्ता वाढते आणि त्याचा थेट परिणाम नागरिकांच्या समाधानावर होतो, असेही त्यांनी स्पष्ट केले.

शिस्तबद्ध आणि वेळेवर कामकाज होण्यासाठी सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी वेळेवर उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचे त्यांनी स्पष्ट निर्देश दिले. यासोबतच, पुढील पंधरा दिवसांनी पुन्हा एकदा सर्व विभागांची पाहणी करून दिलेल्या सूचनांची अंमलबजावणी झाल्याबाबत खातरजमा करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले. तसेच मुख्य प्रशासकीय इमारतीच्या पाहणीनंतर महानगरपालिकेच्या सर्व क्षेत्रीय कार्यालयांची देखील लवकरच पाहणी करण्यात येणार असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

# 'क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सृष्टी' प्रकल्प लवकर पूर्ण करा

## महापौर रवि लांडगे यांचे निर्देश; गुणवत्ता आणि वेळेचा समतोल राखत प्रकल्प पूर्ण करण्यावर भर



**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड शहरात उभारण्यात येत असलेल्या 'क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले सृष्टी' या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे. यासाठी महापालिकेच्या स्थापत्य, विद्युत, उद्यान आदी संबंधित सर्व विभागांनी समन्वय साधून काम करावे, असे निर्देश महापौर रवि लांडगे यांनी दिले.

पिंपरी येथे उभारण्यात येत असलेल्या या प्रकल्पाच्या कामाचा महापौर रवि लांडगे यांनी प्रत्यक्ष स्थळावर भेट देत सविस्तर आढावा घेतला. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी नगरसदस्या अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, माजी नगरसदस्य मारुती भापकर, सामाजिक कार्यकर्ते विशाल जाधव, शंकर लोंढे, प्रल्हाद कांबळे, आनंदा कुदळे, ॲड.विद्या शिंदे, कविता खराडे यांच्यासह महापालिकेचे क्षेत्रीय अधिकारी निवेदिता घार्गे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, कार्यकारी अभियंता वैशाली ननावरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक तसेच सामाजिक कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे यांनी यावेळी प्रकल्पाच्या परिसरात सुरू असलेल्या विविध कामांची पाहणी केली. शिल्प व पुतळ्यांची उभारणी, अत्याधुनिक एलईडी स्क्रीन, प्रकाश व्यवस्था, आकर्षक बाग (गार्डन) तसेच नक्षीकाम यांसारख्या विविध घटकांची माहिती त्यांनी संबंधित विभागांकडून घेतली. प्रत्येक कामाची गुणवत्ता उच्च राखण्याच्या सूचना देत प्रकल्पाचे सौंदर्य आणि उपयुक्तता अधिक प्रभावी करण्यावर त्यांनी भर दिला

महापौर रवि लांडगे म्हणाले की, "महात्मा ज्योतिराव फुले आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांनी समाजप्रबोधनासाठी दिलेले योगदान अतुलनीय आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी ही सृष्टी एक प्रेरणादायी केंद्र ठरेल. त्यामुळे या ठिकाणाची उभारणी करताना दर्जा आणि वेळ यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. शहराच्या सांस्कृतिक, सामाजिक आणि शैक्षणिक जडणघडीत मोलाचा वाटा उचलणाऱ्या या महापुरुषांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या सृष्टीचे काम नियोजित वेळेत व उच्च दर्जाने पूर्ण करण्यात यावे."

या सृष्टीमध्ये नागरिकांसाठी ऐतिहासिक व प्रेरणादायी माहितीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण आणि जनजागृतीची संधी उपलब्ध होणार आहे. एलईडी स्क्रीनद्वारे महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा आढावा तसेच विविध सामाजिक संदेश नागरिकांपर्यंत पोहोचवण्याची व्यवस्था करण्यात येत आहे. याशिवाय आकर्षक बाग, प्रकाशयोजना आणि कलात्मक नक्षीकामामुळे हा परिसर नागरिकांसाठी एक सुंदर पर्यटनस्थळ ठरणार आहे, असेही महापौर रवि लांडगे यांनी सांगितले.

# आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रारींसाठी स्वतंत्र 'ट्रिब्युनल': आमदार शंकर जगताप

## पुणे आणि पिंपरी-चिंचवडच्या आयटी हबसाठी 'ट्रिब्युनल'चे सुरक्षा कवच

**पिंपरी | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड ही शहरे जागतिक स्तरावर 'आयटी हब' म्हणून ओळखली जातात. मात्र, याच क्षेत्रात काम करणाऱ्या आयटी अभियंत्यांची होणारी आर्थिक फसवणूक आणि कंपन्यांकडून घेतले जाणारे सक्तीचे राजीनामे यांसारख्या गंभीर समस्यांवर आता राज्य सरकार ठोस पावले उचलत आहे. आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रार निवारणासाठी केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लवकरच नवीन संहिता आणि स्वतंत्र 'आयटी ट्रिब्युनल' (न्यायाधिकरण) स्थापन करण्यात येणार असल्याची माहिती कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी आमदार शंकर जगताप यांनी लक्षवेधी सूचनेद्वारे मांडलेल्या प्रश्नावर दिली.

आमदार शंकर जगताप यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचनेद्वारे (क्र. १७४२) आयटी क्षेत्रातील ज्वलंत प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधले. हिंजवडी आयटी पार्कमध्ये एका ट्रेनिंग इन्स्टिट्यूटमार्फत १,००० हून अधिक फ्रेशर्स पदवीधरांची सुमारे २ लाख रुपये घेऊन फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार, मोठ्या कंपन्यांमध्ये कर्मचाऱ्यांना दबाव टाकून राजीनामा देण्यास भाग पाडणे, आर्थिक पॅकेज न देता कामावरून काढून टाकणे आणि पीएफ तफावत यांमुळे कर्मचाऱ्यांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी आमदार म्हणाले महाराष्ट्रातील आयटी कर्मचाऱ्यांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्वतंत्र 'आयटी ट्रीब्युनल' स्थापन करण्याची मागणी गेल्या अनेक वर्षांपासून होत आहे. सध्या आयटी कर्मचारी प्रामुख्याने कामगार न्यायालय किंवा औद्योगिक न्यायालय यांच्याकडे दाद मागतात. यावर अनेकदा कायदेशीर पेच निर्माण होतो. आयटी क्षेत्रातील कामाचे स्वरूप वेगळे असल्याने सामान्य कामगार न्यायालयातील प्रक्रिया अत्यंत संथ आणि गुंतागुंतीची वाटते. वेळीच त्यांना न्याय मिळत नसल्याचे आमदार जगताप म्हणाले.



### आयटीयन्सच्या प्रश्नावर वेधले सभागृहाचे लक्ष

» आमदार शंकर जगताप सभागृहात म्हणाले, आयटीयन्सला कायद्यांच्या संरक्षणात्मक कक्षेत समाविष्ट करण्यासाठी आवश्यक दुरुस्त्या करून कामाचे तास, फुल अँड फायनल सेटलमेंट, आणि पीएफ पालन यांवर योग्य नियंत्रण ठेवणे आवश्यक आहे . कामाचे तास वाढवले जात असताना औद्योगिक विवाद अधिनियम अंतर्गत कामगार संज्ञेची आयटी क्षेत्रासाठी स्पष्ट व्याख्या नसल्याने आयटी कर्मचारी अजूनही अनेक संरक्षणात्मक कायदेशीर चौकटींच्या बाहेर आहेत. फुल अँड फायनल सेटलमेंटमध्ये होणारा विलंब, पीएफच्या तफावती, ९० दिवसांच्या नोटीस पिरीयडची सक्ती ही गंभीर समस्या आहे. यावर योग्य सक्षम तक्रार निवारण यंत्रणा उपलब्ध नसल्याने असुरक्षित आयटीयन्सच्या तक्रारीकरिता "औद्योगिक संबंध संहिता २०२० अमलबजावणी, फास्ट-ट्रॅक लेबर कोर्ट प्रणाली किंवा आयटी ट्रायब्युनल सुरू करण्याची नितांत आवश्यकता असल्याची भूमिका आमदार जगताप यांनी यावेळी स्पष्ट आहे.

### स्वतंत्र कोर्टाची प्रक्रिया अंतिम टप्प्यात

» आमदार शंकर जगताप यांच्या प्रश्नाला उत्तर देताना कामगार मंत्री आकाश फुंडकर यांनी सांगितले की, आयटी क्षेत्रातील तक्रारींचे निराकरण करण्यासाठी केंद्र सरकारच्या माध्यमातून नवीन संहिता आणि कोर्ट स्थापन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. "औद्योगिक संबंध संहिता २०२० अंतर्गत नवीन कोर्ट अंतिम करण्याची कार्यवाही केंद्र स्तरावर सुरू आहे. केंद्राच्या गाईडलाईन्स प्राप्त होताच राज्य सरकार तातडीने या कायद्याचा ड्राफ्ट तयार करून ट्रिब्युनलची स्थापना करेल," असे त्यांनी स्पष्ट केले.आयटी कर्मचाऱ्यांना कामगार संज्ञेच्या स्पष्ट व्याख्येत आणून त्यांना कायद्याचे कवच देण्याचा प्रयत्न केला जाईल.

"पुणे-पिंपरी चिंचवडतील आयटी अभियंत्यांवर होणाऱ्या अन्यायाविरुद्ध मी विधानसभेत आवाज उठवला आणि सरकारने 'आयटी ट्रिब्युनल' स्थापन करण्यात येणार असल्याचे सांगितले. याचे समाधान वाटते. सक्तीचे राजीनामे, आर्थिक फसवणूक आणि कामाच्या तासांची मनमानी यांमुळे असुरक्षित असलेल्या आयटी कर्मचाऱ्यांना आता कायद्याचे भक्कम कवच मिळेल. केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचना येताच राज्यात हे स्वतंत्र न्यायालय तातडीने कार्यान्वित व्हावे, यासाठी माझा पाठपुरावा सुरूच राहील. आयटी क्षेत्रातील प्रत्येक तरुणाला न्याय मिळवून देणे, हेच आमचे उद्दिष्ट आहे." या निर्णयामुळे पुणे, पिंपरी-चिंचवडसह राज्यातील लाखो आयटी कर्मचाऱ्यांना मोठा कायदेशीर दिलासा मिळणार आहे.

- प्रशांत जगताप, स्थायी समिती सदस्य, काँग्रेस

# स्थायी समितीकडून शंभर कोटींच्या विकास कामांना मंजुरी

## वायसीएम रुग्णालय, शाळा, जलयंत्रणांसाठी निधी; विशेष सभेत विविध विभागांच्या प्रस्तावांना मंजुरी...

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील सीसीटीव्ही देखभाल व दुरुस्ती करणे, पाणीपुरवठा, विद्युत देखभाल, तसेच विविध विभागांशी संबंधित विषयांना येणाऱ्या सुमारे १०० कोटी रुपये खर्चाच्या कामांना स्थायी समितीने सोमवारी (दि.१६) झालेल्या विशेष सभेत मान्यता दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी समिती अध्यक्ष अभिषेक बारणे होते. यावेळी नवनियुक्त आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगर सचिव मुकेश कोळप, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्यासह स्थायी समिती सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालय, महापालिकेच्या शाळा, प्रशासकीय इमारती, सेक्टर क्रमांक २३ येथील जलशुद्धीकरण केंद्र, रावेत येथील अशुद्ध जलउपसा केंद्र व शहरातील जलकुंभ तसेच, विविध प्रभागांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांच्या सुमारे साडेपाच कोटी रुपये खर्चास मान्यता देण्यात आली.

पाणीपुरवठा यंत्रणा, पंपहाऊस, ट्रान्सफॉर्मर व विद्युत यंत्रणांशी संबंधित विविध कामांसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. महापालिकेच्या विविध इमारती, शाळा व दवाखान्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यासाठीच्या २२ लाख ७५ हजार रुपये कामास मुदतवाढ देणे. पुणे महानगर परिवहन महामंडळातील (पीएमपीएल) कर्मचाऱ्यांच्या सातव्या वेतन आयोगाच्या फरक रकमेच्या दुसऱ्या हप्त्यासाठी महापालिकेच्या वाट्याचा ५६ कोटी १० लाखांचा निधी अग्रिम स्वरूपात देणे, या विषयांना मंजुरी देण्यात आली.

याशिवाय यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालय, महापालिकेच्या शाळा, प्रशासकीय इमारती तसेच विविध प्रभागांमध्ये बसविण्यात आलेल्या सीसीटीव्ही यंत्रणांच्या वार्षिक देखभाल व दुरुस्ती कामांसाठीच्या निविदांनाही स्थायी समितीने मंजुरी दिली. तसेच पाणीपुरवठा यंत्रणा, पंपहाऊस, ट्रान्सफॉर्मर व विद्युत यंत्रणांशी संबंधित कामांसाठी येणाऱ्या खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच महापालिकेच्या इमारती, शाळा व दवाखान्यांमधील पिण्याच्या पाण्याच्या टाक्यांची स्वच्छता करण्यासाठीच्या कामास मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.



### संभाजी महाराज पुतळ्याच्या खर्चास मान्यता

» बोऱ्हाडेवाडी, मोशी येथील छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळा परिसरात सुशोभिकरणासाठी स्थापत्य व विद्युत कामाच्या एकूण ५० कोटी खर्चाचे दोन विषय बुधवार (दि.११) च्या सभेत तहकूब करण्यात आले होते. त्यावरून शुक्रवारी (दि.१३) सर्वसाधारण सभेतही वाद झाला होता. त्याला दोन विषयाना आजच्या सभेत मान्यता देण्यात आली.

# घनकचरा प्रकल्पाला गती; शहरातील कचरा व्यवस्थापनाला चालना

## नव्या क्षमतेमुळे स्वच्छता व्यवस्थेला बळ; दीर्घकालीन उपाययोजनांना चालना

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात दररोज तयार होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. शहरात निर्माण होणाऱ्या कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक फायदा असल्याचे सर्वांच्याच लक्षात आल्याने कचऱ्याच्या कामात अधिक लक्ष घालण्यास राजकीय पक्षांच्या मंडळींनी सुरुवात केली आहे.

यामध्ये महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकाऱ्यांचा सहभाग आहे. हातात असलेल्या सत्तेचा वापर करून कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचे काम आपल्या मर्जीतील ठेकेदाराला कसे मिळाले यासाठी दबाव तंत्राचा वापर केला जात आहे. महापालिका प्रशासनातील अधिकाऱ्यांना हाताशी धरून घनकचरा विभागातील कामे कशी मिळते यासाठी राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आणि कार्यकर्त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत.

उरुळी देवाची येथील घनकचरा प्रकल्पाची क्षमता वाढवून ५०० टन केली जाणार असून, हा प्रकल्प दहा वर्षांसाठी देखभाल दुरुस्तीसह चालविण्यासाठी दिला जाणार आहे. हे काम निविदा प्रक्रिया न राबविता विशिष्ट ठेकेदाराला देण्याचा घाट मंगळवारी स्थायी समितीत घालण्यात आला. त्याला विरोध झाल्याने आयत्या वेळी आलेला हा प्रस्ताव आता कार्यपत्रिकेवर घेण्यात येणार आहे.

महापालिकेत सत्ताधारी असलेल्या भाजप नेत्याच्या मर्जीतील कंपनीला हे काम देण्यासाठी स्थायी समितीच्या बैठकीत आयत्या वेळी हा प्रस्ताव आणून त्याला मान्यता घेण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा आरोप होत आहे. विरोधी पक्षाच्या सदस्यांनी याला विरोध केल्याने हा प्रस्ताव मान्य न करता कार्यपत्रिकेवर आणण्याचा निर्णय घेण्यात आला.

महापालिकेत नव्याने ३४ गावांचा समावेश झाल्याने महापालिकेची हद्द वाढली आहे. वाढत्या शहरीकरणामुळे नागरी विस्तारदेखील वेगाने होत आहे. शहरात रोज २ हजार ३०० ते २ हजार ४०० टन कचरा निर्माण होतो. या कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावणे बंधनकारक आहे. यासाठी शहराच्या विविध भागांत घनकचरा प्रक्रिया उभारणे आवश्यक आहे. पुणे महापालिकेचा उरुळी देवाची येथे घनकचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प आहे.

या प्रकल्पाची क्षमता वाढवून ती ५०० टन केली जाणार आहे. हा प्रकल्प १० वर्षांसाठी चालविण्यासाठी देण्यात येणार आहे. या प्रकल्पात प्रतिटन ६९५ रुपये 'टिपिंग फी' दिली जाणार आहे. यासाठी दर वर्षी १० टक्के दरवाढीला मंजुरी देण्यात आली आहे. स्थायी समितीत हा प्रस्ताव आयत्या वेळी मान्यतेसाठी आणण्यात आला. मात्र, त्याला विरोध झाल्याने माननीयांच्या पदरी निराशा पडली.




### कचरा प्रकल्पावरून राजकीय वाद

**» पुणे महापालिकेच्या घनकचरा प्रकल्पावरून राजकीय वातावरण तापले आहे. उरुळी देवाची येथील प्रकल्पाची क्षमता वाढवून ५०० टन करण्याचा प्रस्ताव स्थायी समितीत आयत्या वेळी मांडण्यात आला. मात्र, हा प्रस्ताव विशिष्ट ठेकेदाराला लाभ मिळावा यासाठीच आणल्याचा आरोप विरोधकांनी केला. सत्ताधाऱ्यांकडून दबाव टाकून काम मंजूर करून घेण्याचा प्रयत्न होत असल्याचेही सांगण्यात आले. त्यामुळे स्थायी समितीत या विषयावर जोरदार चर्चा होऊन वाद निर्माण झाला.**

### शहरातील कचरा व्यवस्थापनाचे आव्हान

**» पुणे शहरात दररोज सुमारे २३०० ते २४०० टन कचरा निर्माण होतो. वाढत्या शहरीकरणामुळे कचरा व्यवस्थापन हे मोठे आव्हान बनले आहे. त्यामुळे उरुळी देवाची येथील प्रकल्पासारख्या सुविधांची क्षमता वाढवणे आवश्यक आहे. मात्र, अशा महत्त्वाच्या प्रकल्पांमध्ये पारदर्शकता आणि योग्य नियोजन असणे गरजेचे आहे. कचऱ्याची शास्त्रीय पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी प्रशासनाने दीर्घकालीन धोरण आखण्याची गरज व्यक्त केली जात आहे.**

> **शहरातील ५०० टन कचऱ्यावर प्रक्रिया करणारा प्रकल्प विनानिविदा उभारण्यास देणे चुकीचे आहे. त्यामुळे स्थायी समितीच्या बैठकीत या प्रस्तावाला विरोध केला. आता हा प्रस्ताव कार्यपत्रिकेवर येणार आहे.**
>
> **- प्रशांत जगताप, स्थायी समिती सदस्य, काँग्रेस**

# पुणेकरांवर पाणीटंचाईचे सावट, मंजूर कोट्यापेक्षा अधिक पाण्याची उचल...

## ऐन उन्हाळ्यात होवू शकतो पाणी कपात; आगामी चार महिने ठरणार आव्हानात्मक

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या धरणांमध्ये सध्या काही प्रमाणात पाणीसाठा उपलब्ध असला, तरी येत्या काही महिन्यांत पाणीटंचाईचा सर्वाधिक फटका पुणेकरांनाच बसण्याची चिन्हे दिसत आहेत. पाटबंधारे विभागाच्या आकडेवारीनुसार, पुणे महापालिकेकडून मंजूर पाणी कोट्यापेक्षा अधिक पाणी उचलले जात आहे. परिमाणी येत्या चार महिन्यांसाठी आवश्यक असलेल्या पाण्याच्या तुलनेत उपलब्धता मर्यादित असल्याचे चित्र आहे. त्यामुळे ऐन उन्हाळ्याच्या काळात शहरातील पाणीपुरवठ्यावर ताण येण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

शहराला खडकवासला धरण साखळी, भामा-आसखेड धरण, पवना नदीवरील रावेत बंधारा आणि भीमा नदीवरील वढू बंधारा या प्रकल्पांमधून पाणीपुरवठा केला जातो. या सर्व प्रकल्पांमधून मिळणाऱ्या पाण्याच्या कोट्याचा आणि प्रत्यक्षात उचलल्या जाणाऱ्या पाण्याचा ताळमेळ बसत नसल्याने भविष्यातील पाणीपुरवठ्याचे नियोजन अधिक कठीण होत असल्याचे पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांचे मत आहे.

खडकवासला धरण साखळीमधून शहरासाठी दरवर्षी १२.९३२ टीएमसी पाणी मंजूर आहे. मात्र, प्रत्यक्षात महापालिकेकडून दरवर्षी सुमारे १९.३३ टीएमसी म्हणजेच तब्बल ६.३९ टीएमसी जास्त पाणी उचलले जाते. शहराची वाढती लोकसंख्या, नव्याने समाविष्ट झालेली गावे आणि वाढलेली पाणी गरज यामुळे हा ताण निर्माण झाला आहे.

पवना नदीवरील रावेत बंधाऱ्यामधून शहरासाठी ०.६७६ टीएमसी पाणी मंजूर असताना सध्या सुमारे ०.३४ टीएमसी पाणी उचलले जात आहे. तर भामा-आसखेड धरणामधून २.६७२ टीएमसी पाण्याचा कोटा मंजूर असून त्यापैकी दरवर्षी सुमारे १.९४ टीएमसी पाणी उचलण्यात येते. भीमा नदीवरील वढू बंधाऱ्यामधून ०.०८३ टीएमसी मंजूर कोट्यापैकी सुमारे ०.०५ टीएमसी पाणी शहरासाठी वापरले जाते.



### उपलब्ध साठा पुरेसा असला तरी...

**» पाटबंधारे विभागाकडील आकडेवारीनुसार, १७ मार्च अखेर शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या विविध प्रकल्पांमध्ये मिळून सुमारे २५.५८२ टीएमसी इतका पाणीसाठा उपलब्ध आहे. मात्र आगामी उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर ४ मार्च ते १५ जुलै या १३४ दिवसांच्या कालावधीत शहरासाठी अंदाजे ७.१२२ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. त्यामुळे उपलब्ध साठा पुरेसा असला तरी, वाढती लोकसंख्या, शेतीसाठी होणारा पाण्याचा वापर आणि शहराची वाढती गरज लक्षात घेता पाण्याचे काटेकोर नियोजन करणे आवश्यक ठरणार आहे. दररोज शेतीसाठी चार टीएमसी पाणी लागत असल्याची माहिती विद्युत विभागाचे रामदास तारू यांनी दिली.**

# हिंजवडीत घरनोंदणीचा ऐतिहासिक विक्रम; एका दिवसात 300हून अधिक व्यवहार

## डिजिटल नोंदणी प्रक्रियेमुळे विक्रीला वेग; हिंजवडीत घरखरेदीदारांचा प्रचंड प्रतिसाद

**पुणे | प्रतिनिधी**

हिंजवडीतील राजीव गांधी इन्फोटेक पार्कमध्ये गेल्या काही वर्षांत घरांना मोठ्या प्रमाणात मागणी वाढत आहे. यामुळे या परिसरात घरांच्या किमतीही प्रचंड वाढल्या आहेत. घरांच्या किमतीमध्ये वाढ झाल्याने घरभाडेही जास्त झाले आहे. या परिसरात घरांच्या किमती जास्त असूनही ग्राहकांची पसंती कायम आहे. क्रिसाला डेव्हलपर्सने हिंजवडीतील प्रकल्पात एकाच दिवसात सर्वाधिक घरांच्या नोंदणीचा विक्रम नोंदविला आहे.

क्रिसाला डेव्हपर्सकडून 'क्रिसाला ग्रँड रेकॉर्ड रजिस्ट्री' या उपक्रमांतर्गत पार पडलेल्या या उपक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये होणार असून, एका दिवसात विकसकाकडून करण्यात आलेल्या सर्वाधिक मालमत्ता करारांच्या नोंदणीचा हा विक्रम ठरला आहे. क्रिसाला डेव्हलपर्सने ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित करत एकाट दिवसात ३०० हून अधिक मालमत्ता नोंदणी पूर्ण केल्या. या उपक्रमादरम्यान दोन्ही रेकॉर्ड संस्थांचे अधिकारी उपस्थित राहून संपूर्ण प्रक्रियेची पडताळणी व प्रमाणीकरण करण्यात आले.

उत्तर हिंजवडीतील क्रिसाला–हिरानंदानी टाऊनशिपच्या फेज १ आणि फेज २ तसेच क्रिसालाच्या इतर प्रकल्पांमधील घरांची नोंदणी या उपक्रमांतर्गत पूर्ण करण्यात आली. मर्यादित वेळेत मोठ्या प्रमाणावर पार पडलेल्या या नोंदणी मोहिमेमुळे शेकडो घरखरेदीदारांना एका दिवसात सहजपणे मालमत्ता नोंदणी पूर्ण करता आली. डिजिटल दस्तऐवजीकरण, सुलभ पडताळणी प्रक्रिया आणि समन्वयित नोंदणी व्यवस्थेच्या मदतीने हा उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला.

हा उपक्रम देशातील डिजिटल व्यवहार प्रणालीला चालना देणारा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. या नोंदणी उपक्रमासाठी व्यापक पूर्वतयारी करण्यात आली होती. त्यामध्ये आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, डिजिटल पायाभूत सुविधा उभारणी, ग्राहकांशी समन्वय, तसेच बँकिंग भागीदार आणि ग्राहक संबंध व्यवस्थापन पथकांची कामगिरी महत्वाची ठरली. आजचे ग्राहक केवळ घराच्या क्षेत्रफळाकडे न पाहता संपूर्ण जीवनशैलीसाठी सुसंगत सुविधा देणाऱ्या प्रकल्पांमध्ये गुंतवणूक करीत आहेत. या विक्रमी उपक्रमाद्वारे तंत्रज्ञान आणि नियोजनाच्या मदतीने डिजिटल युगात घरमालकीचा अनुभव अधिक सुलभ कसा होऊ शकतो हे दाखवून दिले आहे.



### ग्राहकांचा वाढता कल

» हिंजवडी परिसरात घरांची वाढती मागणी कायम असून उच्च किमती असूनही ग्राहकांचा कल कमी झालेला नाही. जीवनशैलीला पूरक सुविधा, उत्तम लोकेशन आणि पायाभूत सुविधा यामुळे प्रकल्पांना चांगला प्रतिसाद मिळत आहे. अल्पावधीत हजारो घरे विकली जाणे हेच या भागातील रिअल इस्टेटची ताकद दर्शवते.

### डिजिटल प्रक्रियेचा प्रभाव

» डिजिटल दस्तऐवजीकरण, सुलभ पडताळणी आणि समन्वयित व्यवस्थापनामुळे मोठ्या प्रमाणावर नोंदणी प्रक्रिया एका दिवसात पूर्ण करणे शक्य झाले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवहार सुलभ, जलद आणि पारदर्शक करण्यात आले. त्यामुळे ग्राहकांचा वेळ वाचला आणि प्रक्रियेत अडथळे कमी झाले. हा उपक्रम डिजिटल व्यवहार व्यवस्थेच्या प्रभावी अंमलबजावणीचे उत्तम उदाहरण ठरला आहे.

### विक्रमाची नोंद

» हिंजवडीतील प्रकल्पात एका दिवसात ३०० हून अधिक घरनोंदणी पूर्ण करत क्रिसाला डेव्हलपर्सने नवा विक्रम प्रस्थापित केला. या उपक्रमाची नोंद इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड्स आणि एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये होणार असून, विकसकाकडून एका दिवसात झालेल्या सर्वाधिक मालमत्ता नोंदणीचा हा मानाचा टप्पा ठरला आहे. या विक्रमामुळे रिअल इस्टेट क्षेत्रात नव्या शक्यता निर्माण झाल्या आहेत.

# वढू-तुळापूर येथे संभाजी महाराज पुण्यतिथीनिमित्त भक्तांची गर्दी

## 337 व्या पुण्यतिथीनिमित्त शंभू भक्तांचा महासागर; महापूजा, कीर्तन व पुष्पवृष्टी कार्यक्रम उत्साहात

**पुणे | प्रतिनिधी**

स्वराज्यरक्षक धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराजांची ३३७ वी पुण्यतिथी निमित्त श्री क्षेत्र वढू बुद्रुक (ता.शिरूर) व तुळापूर (ता.हवेली) येथे शंभू राजेंना अभिवादन करून शंभू राजेंच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी सकाळी पहाटे पासूनच शंभू भक्तांच्या रांगा लागल्या होत्या. तर सकाळी १० नंतर शंभू भक्तांच्या अलोट महासागरात प्रचंड वाढ होत गेल्याचे पाहण्यास मिळाले

उपस्थित शंभू भक्तांसाठी वाहन पार्किंग व्यवस्था, शौचालय सुविधा, रुग्णवाहिका, हिरकणी कक्ष, विसाव्या साठी प्रशस्त मंडप, आरोग्य कक्ष सीसीटीव्ही कॅमेरे, जेवण, पिण्याचे पाणी, थंड पेय सह आवश्यक मूलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात आली होती.

श्री क्षेत्र तुळापूर येथील कार्यक्रमाचे आयोजन पुणे जिल्हा परिषद,हवेली पंचायत समिती, श्रीक्षेत्र तुळापूर ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने तर श्रीक्षेत्र वढू बुद्रुक येथील कार्यक्रमाचे आयोजन धर्मवीर संभाजी महाराज स्मृती समिती, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज युवा मंच तसेच वढू बुद्रुक ग्रामपंचायत व समस्त ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित करण्यात आले.

सकाळी ५ वाजता धर्मवीर छत्रपती श्री संभाजी महाराज व कवी कलश समाधींचा महाअभिषेक करण्यात आला.मूकपद यात्रा नंतर ८.वाजुन ३० मिनिटांनी जिल्हाधिकारी राजेंद्र डूडी व पोलिस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या हस्ते शासकीय महापूजा संपन्न झाली.९ वाजता ह.भ.प. संग्रामबापू भंडारे यांचे कीर्तन ऐकण्यासाठी हजारो शंभू भक्तांनी हजेरी लावली असल्याचे पाहण्यास मिळाले. दुपारी १२ वाजता प्रतिज्ञा व वेध मंत्रोच्चार तसेच गृह विभाग मानवंदना,माजी सैनिक मानवंदना व शस्त्रास्त्र शास्त्रपारंगत मानवंदना संपन्न झाली.या वेळी आकाशातून हेलिकॉप्टर द्वारे शंभू महाराजांच्या समाधी स्थळावर पुष्पवृष्टी करण्यात आली.दरम्यान १२ वा.३० मिनिटांनी धर्मसभेस सुरुवात झाली. सकाळी १० नंतर शंभू भक्तांच्या अलोट महासागरात प्रचंड वाढ होत गेल्याचे पाहण्यास मिळाले



### दर्शनासाठी मान्यवरांची उपस्थिती

» सकाळी ७ वाजता उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार ,शिरूर हवेलीचे आमदार माऊली कटके तसेच शंभूराजेंचे वंशज वृषालीराजे भोसले यांनी शंभूराजांना अभिवादन करून शंभू चरणी नतमस्तक झाले.